महाराष्ट्रराज्यमाध्यमिकवउच्चमाध्यमिकशिक्षणमंडळ,
नागपूरविभागीयमंडळ, सिव्हिललाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक / नाविमं / प.मा. / 1568
दिनांकः– 25 / 05 / 2024

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10 वी,) मार्च– 2024 चा निकाल ऑनलाईन जाहीर करणेबाबत.

संदर्भः– 1. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं. / परीक्षा–2 / 2006 दि. 25 / 05 / 2024.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, मार्च– 2024 मध्ये आयोजित माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10 वी) परीक्षेचा निकाल दि.–27 / 05 / 2024 रोजी दुपारी 01:00 वाजता ऑनलाईन जाहीर करणेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

KPLande
(कल्पना लांडे)
विभागीय सहा. सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

प्रतिलिपीः–

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3 शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०२४ चा निकाल**

---

मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर सोमवार, **दिनांक २७/०५/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.**

**अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.**

१. https://mahresult.nic.in

२. http://sscresult.mkcl.org

३. https://sscresult.mahahsscboard.in

४. https://results.digilocker.gov.in

५. https://results.targetpublications.org

६. https://www.tv9marathi.com

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) मार्च २०२४ परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल.

https://mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालासंबत निकालाबाबतची इतर सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल.

तसेच https://mahahsscboard.in या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (**http://verification.mh-ssc.ac.in**) स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी मंगळवार, दिनांक २८/०५/२०२४ ते मंगळवार, दिनांक ११/०६/२०२४** पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking यांद्वारे भरता येईल.

२) मार्च २०२४ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) मार्च २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी **(जुलै-ऑगस्ट २०२४ व मार्च २०२५) श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) **जुलै-ऑगस्ट २०२४** मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी **शुक्रवार दिनांक ३१/०५/२०२४** पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- २५/०५/२०२४